# बालहक्क कृती समिती, पुणे

आयोजित चर्चा

# द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सिस ॲक्ट - २०१२

वाय्. एम्. सी. ए. पुणे

१९ जानेवारी, २०१३

आवृत्ती पहिली - जानेवारी २०१३
आवृत्ती दुसरी - मार्च २०१३

बाल हक्क कृती समिती

## प्रस्तावना

मुलांवरील, स्त्रियांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटना नवीन नाहीत. त्या होतच आल्या आहेत दिल्लीत घडलेल्या सामूहिक बलात्काराच्या घटनेने समाजमन खडबडून जागे झाले आहे. काय करावे, कसे करावे, निर्घृण अत्याचार करणा-यांना कसे आवरावे, त्यांचे काय करावे कुणालाच काही कळेनासे झाले आहे.विचारपूर्वक किंवा अविचाराने उपाय सुचवले जाताहेत. कायदे कठोर करा, पोलिसांना संवेदनक्षम बनविण्यासाठी प्रशिक्षण द्या, लैंगिक गुन्ह्यांची प्रकरणे समोर येतील तेव्हा तातडीने योग्य ती पाऊले उचलायला पोलिसांना शिकवा, अपराध्यांना फाशी द्या, औषधाने नपुंसक बनवा; हे आणि असे बरेच काही.

लैंगिक गुन्ह्यांचे प्रमाण असे अचानक कसे वाढले असाही प्रश्न काहींना पडतो. हे प्रमाण वाढले आहे किंवा नाही हे आकडेवारीने सिध्द करणे त्याबाबतच्या मौनामुळे अवघड आहे. एवढे खरे की झाल्या घटनेने सगळा समाज ढवळून निघाला आहे आणि मुख्यतः प्रसार माध्यमांनी विषय (कदाचित नको तेवढा) उचलून धरला आहे यामुळे विषयाची धार, लोकांची या बाबतीतली संवेदनक्षमता बोथट तर होणार नाही ना अशी रास्त भीती वाटते आहे.

आपल्याकडे अनेक चांगले लोकाभिमुख कायदे आहेत. अंमलबजावणी कितीशी होते? नुसते कठोर कायदे करून, पोलिसांना प्रशिक्षण देऊन प्रश्न सुटणार आहे का? न्यायव्यवस्था, पोलिस यन्त्रणा यांच्याबरोबरच समाजातील सर्व घटकांनी प्रत्येक वेळी काही घडले की त्याला कसेबसे सामोरे जायचे सोडून असे प्रकार घडणार नाहीत, समाजात स्त्रिया आणि मुले सुरक्षित राहतील यासाठी सातत्याने आणि विचारपूर्वक कृतिशील होण्याची गरज आहे.

बाल हक्क कृती समितीसाठी संकलित केलेल्या या पुस्तिकेत नव्याने अस्तित्वात आलेला 'लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा - २०१२' सोपा करून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.हे कायद्याचे संपूर्ण भाषांतर नव्हे पण सर्व महत्त्वाचे मुद्दे यात येतील असा प्रयत्न केला आहे. कायद्यातली सकारात्मक तरतूद तसेच प्रथम दर्शनी त्यात जाणवलेल्या त्रृटींचाही उल्लेख आहे. कायदा जसजसा वापरला जाईल तसतसे त्याचे आणखी पदर उलगडत जातील. या कायद्याची पार्श्वभूमी म्हणून राज्यघटनेतील संबंधित तरतुदी, भारतीय दंड संहिता, बाल न्याय (काळजी आणि संरक्षण) कायदा, बाल हक्क संहिता यांचा संदर्भही थोडक्यात दिला आहे.

नवा कायदा आणि आधीच्या तरतुदींची तुलना केली तर कितीतरी तरतुदींचा वापरच आपले राष्ट्रीय धोरण, कायदे किंवा योजना यांमध्ये केला गेलेला नाही असे दिसते. त्यामुळे मुलांवरील लैंगिक अत्याचाराची व्याख्या अधिक व्यापक करून एकंदर कायद्याची प्रक्रिया तपशिलात मांडणा-या कायद्याचे स्वागत करायला हवे.

हा कायदा समजून घेण्यासाठी, मुलांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर प्रत्यक्ष काम करण्यासाठी कार्यकर्त्यांना या पुस्तिकेचा उपयोग होईल असा विश्वास वाटतो. कार्यकर्ते याचा वापर करणार आहेत हे लक्षात घेऊन प्रथम माहिती अहवाल, बाल कल्याण समितीच्या जबाबदा-या तसेच प्रत्येक संस्थेसाठी आता अनिवार्य असलेले 'बाल संरक्षण धोरण'ही यात दिले आहे ते उपयोगी ठरावे.

'फौजदारी गुन्ह्याबाबतच्या कायदेशीर तरतुदीः सुलभ मांडणीः पोलिसांसाठी मार्गदर्शिका' या ॲड. कबिर दुग्गल आणि संगिता पुणेकर यांनी संकलित केलेल्या मसुद्यातील काही भाग उद्‌धृत करण्याची परवानगी दिल्याबद्‌दल त्यांचे, बाल संरक्षण धोरणाचे सोप्या भाषेतले टिपण वापरण्याची परवानगी दिल्याबद्‌दल संतोष शिंदे यांचे तसेच आलोचना या पुण्यातील संस्थेचे मुद्रितशोधन आणि काही उपयुक्त सूचनांबद्‌दल मनःपूर्वक आभार.टंकलेखनातील मदतीसाठी राकेश घाडीचेही आभार.

हा कायदा समजून घेण्यासाठी, त्यावरच्या प्रतिक्रिया, सूचना, संबंधित मंत्रालयाला कळविण्यासाठी फॅक्सेने (बाल लैंगिक शोषण विरोधी मंच) या प्रश्नावर काम करणाऱ्या संस्था आणि ॲड. महारूख एडनवाला यांच्यासोबत अनेक बैठका घेतल्या. त्यामुळेच कायद्याची पदवी नसताना कायदा थोडक्यात मराठीत आणण्याचे धाडस केले आहे.

या कायद्याचा उपयोग करून घेताना आलेले आपले अनुभव आणि या पुस्तिकेत आणखी काय असावे असे वाटते ते आम्हाला जरूर कळवा त्याचे स्वागत असेल.

विद्या आपटे

**बाल लैंगिक शोषण विरोधी मंच, मुंबई**

**(FACSE)**

Email :- **facse95@gmail.com**
Mobile: - 9869989841

# मुलांचे लैंगिक शोषण आणि कायदा

अमीर खान यांच्या 'सत्यमेव जयते' या कार्यक्रमात पहिलाच विषय घेतला गेला 'मुलांचे लैंगिक शोषण.' या कार्यक्रमाद्वारे त्याबद्दलची काहीशी जाणीव आपल्या समाजाच्या वेगवेगळ्या थरांपर्यंत पोहोचली असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

या कार्यक्रमानंतर काही महिन्यात 'द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सिस ॲक्ट - २०१२' हा कायदा अस्तित्वात आला. एक गैरसमज असा की 'सत्यमेव जयते' च्या कार्यक्रमामुळेच हे शक्य झाले. मुलांवरील लैंगिक अत्याचाराचा प्रश्न मोठ्या प्रमाणात समाजाच्या नजरेसमोर आणण्याचे काम या कार्यक्रमाने केले असले तरी कायद्याचे श्रेय त्याला देणे उचित ठरणार नाही. कायदा बनविण्याची प्रक्रिया ही खूप जिकिरीची आणि वेळ खाणारी असते.

सरकार, समाज आणि कुटुंब यांच्याकडून मुलांच्या हक्कांचे नेहमीच उल्लंघन होत आले आहे. वय किंवा परिस्थितीमुळे अनेकदा मुलांना याची जाणीव नसते किंवा कधी असली तरी हे थांबवावे कसे हे त्यांना कळत नाही. अलीकडच्या काळात मुलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे कार्य सामाजिक कार्यकर्ते करत असले तरी हे हक्क मुलांना मिळवून देण्याची जबाबदारी प्रामुख्याने पालक, सरकारी यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि इतर प्रौढ व्यक्तींचीही आहे. पोलीस यंत्रणा हा यातला एक महत्त्वाचा घटक असतो.

आजपर्यंत भारतीय दंडविधान संहिता (IPC) कलम ३७५ - बलात्कार, कलम ३७६ आणि ३६६ - बलात्कारासाठी शिक्षा, कलम ३७७ अनैसर्गिक गुन्हे, कलम ३५४ स्त्रीचा अपमान होईल किंवा तिच्या मर्यादशीलतेचा भंग होईल असे हेतूपूर्वक वागणे तसेच बाल न्याय अधिनियम (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, २००० - २००६ यांच्या आधारे मुलांवरील लैंगिक गुन्ह्यांचा तपास केला जात होता.

मुलांचे वय, पूर्ण विकसित न झालेले शरीर आणि मन लक्षात घेता लैंगिक गुन्ह्यांचे त्यांच्यावर होणारे परिणाम अधिक गंभीर, त्यांच्या व्यक्तिमत्वावर, भविष्यावर दूरगामी परिणाम करणारे असतात. म्हणूनच मुलांच्या बाबतीतल्या लैंगिक गुन्ह्यांसाठी स्वतंत्र कायदा असायला हवा अशी सामजिक कार्यकर्त्यांची अनेक वर्षांची मागणी होती. ही मागणी 'लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा - २०१२' या नवीन कायद्याने पूर्ण होत आहे.

'द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सिस ॲक्ट - २०१२' हा कायदा समजून घेण्यापूर्वी या संदर्भातली कायद्याची पार्श्वभूमी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. भारतीय राज्यघटनेपासूनच्या कायद्याच्या प्रवासावर आपण येथे नजर टाकूया.

## भारतीय राज्यघटना

भारतीय राज्यघटना हा भारतातील सर्वात जास्त मूलभूत असा कायदा आहे. तो भारताच्या सर्व कायद्यांचा मूलस्त्रोत आहे. भारतीय राज्यघटनेच्या भाग तीनमध्ये म्हणजे मूलभूत हक्कांमध्ये आणि भाग चार म्हणजे शासकीय धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बालकांच्या संबंधी तरतुदी आहेत.

- भाग तीन अंतर्गत असलेल्या तरतुदी कायद्याने अमलात आणता येतात याची नोंद घेणे महत्त्वाचे आहे.
- भाग चार हा जरी राज्यसरकारसाठी मूलभूत असला तरीही कायद्याने अमलात आणता येत नाही.

### भाग तीन

### मूलभूत हक्क

**अनुच्छेद १४:** या कलमाव्दारे अशी हमी देण्यात येते की कायद्यासमोरील समता व कायद्याचे समान संरक्षण या बाबी भारताच्या भूप्रदेशात शासन कोणालाही नाकारणार नाही.

**अनुच्छेद १५:** कलम १५ (१) धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थळ यांच्या आधारावर भेदभाव करण्यास मनाई करते. परंतु कलम १५ (३) मात्र स्त्रिया व मुलांसाठी विशेष तरतुदी करण्यास शासनाला अनुमती देते. बालकांच्या लाभासाठी केलेले विशेष कायदे भेदभाव म्हणून मोडीत काढता येणार नाहीत.

**अनुच्छेद १९:** हे कलम भारतीय नागरिकांना सहा मूलभूत स्वातंत्र्यांची हमी देतेः

- भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य
- शांततापूर्ण रीतीने एकत्र जमणे
- संघटना किंवा संघ बनवणे
- भारताच्या भूप्रदेशात मुक्त संचार
- भारतात कुठेही निवास करणे व
- कोणताही व्यवसाय करणे किंवा कोणताही उद्योग चालवणे.

**हे अधिकार स्वयंपरिपूर्ण नाहीत, त्यांना रीतसर मर्यादांचे बंधन आहे.**

**अनुच्छेद २१:** हे कलम सर्व व्यक्तींना जीविताची व व्यक्तीगत स्वातंत्र्याच्या अधिकाराची हमी देते. 'सर्व व्यक्ती' या शब्दाच्या परिघात नागरिक तसेच बिगर नागरिक समाविष्ट आहेत, तसेच व्यक्ती हा शब्द मुलांनाही लागू आहे. सर्वोच्च न्यायालयाने ''जीविताहक्क'' या अधिकाराचा परीघ वाढवून त्यात अन्न, वस्त्र, पुरेसा निवारा यांचा हक्क आणि प्रतिष्ठेसह परिपूर्ण जीवन जगण्यासाठी लागणा-या इतर मूलभूत गरजांचाही समावेश केला आहे.

**अनुच्छेद २१ (अ):** राज्य सरकार ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण देईल.

**अनुच्छेद २३:** हे कलम माणसांची सौदेबाजी, वेठबिगारी या गोष्टींना मनाई करते. या बाबींचे कोणत्याही प्रकारचे उल्लंघन हे कायद्याने शिक्षापात्र आहे. लैंगिक शोषणाच्या उद्‌देशाने आजच्या काळात चालू असलेली मुलांची प्रचंड सौदेबाजी लक्षात घेता, हे कलम विशेष म्हणायला हवे.

**अनुच्छेद २४:** कारखान्यात वगैरे मुलांना कामाला लावण्यास मनाई. चौदा वर्षाखालील कोणत्याही मुलाला कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत कामाला ठेवता येणार नाही किंवा इतर कोणत्याही जोखमीच्या नोकरीत गुंतवता येणार नाही.

**अनुच्छेद २९ व ३०:** ही कलमे सांस्कृतिक, धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांना काही विशिष्ट सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकारांची हमी देतात.

**भाग चार**
**शासकीय धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे**

**अनुच्छेद** ३९(e) व (f): दुर्व्यवहार होण्यापासून आणि त्यांच्या वयाला व शक्तीला अयोग्य अशा व्यवसायामध्ये शिरण्यापासून कोवळ्या वयाच्या मुलांचे संरक्षण करण्याची शासनाने हमी घेतली पाहिजे. तसेच मुलांचा निरोगी पध्दतीने विकास व्हावा म्हणून त्यांना समान संधी व सुविधा पुरवल्या पाहिजेत. बालपण व तारूण्य यांचा शोषण आणि परित्याग यांच्यापासून बचाव करण्याची हमीही शासनाने दिली पाहिजे.

**अनुच्छेद ४१:** आपली आर्थिक कुवत व विकास यांना अनुसरून शासन बेरोजगारी, वृध्दत्व, आजारपण, अपंगत्व आणि इतर गरजा यांच्या संदर्भात काम करण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक साहाय्याचा हक्क मिळवून देण्यासाठी प्रभावी तरतूद करेल.

**अनुच्छेद ४४:** भारताच्या सर्व भूप्रदेशात आपल्या नागरिकांसाठी समान नागरी कायदा लागू करण्याचा शासन प्रयत्न करील.

**अनुच्छेद ४५:** मुलांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूदः या राज्यघटनेच्या प्रारंभापासून दहा वर्षाच्या कालावधीमध्ये मुलांना चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद करण्याचा प्रयत्न शासन करील.

**अनुच्छेद ४७:** हे कलम शासनाला आपल्या लोकांचा जीवनस्तर वाढविणे व सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे आपल्या प्राथमिक कर्तव्याचा भाग आहेत असे मानायला लावते.

**अनुच्छेद ५१ (C): मूल**भूत कर्तव्यांची तरतूद कलम ५१ मध्ये आहे. आंतरराष्ट्रीय कायदा आणि कराराच्या शर्ती यांचा शासनाने आदर राखला पाहिजे. बालहक्काच्या करारामध्ये समाविष्ट असलेल्या अभिवचनांना भारत सरकार तसेच राज्य सरकार बांधिल आहेत.

**अनुच्छेद ३५० (A)**ः प्रत्येक राज्य व स्थानिक संस्था भाषिक अल्पसंख्याक मुलांना त्यांच्या मातृभाषेत प्राथमिक शिक्षण मिळावे या दृष्टीने पुरेशा सुविधा पुरवण्याचा प्रयत्न करील.

**********

## भारतीय दंड संहिता - १८६०

लॉर्ड थॉमस बी. मेकॉले यांनी मसुदा तयार केलेली भारतीय दंड संहिता, १८६० म्हणजे (फौजदारी) गुन्ह्यांची व्याख्या करणारा व त्यासाठी शिक्षा सांगणारा असा भारतातील मूलभूत कायद्यांच्या मूळग्रंथ आहे.

मुलांशी दुर्व्यवहार करणारी व्यक्ती लैंगिक गुन्ह्यांबरोबरच इतर अनेक गुन्हे करत असते, आणि त्यासाठीही त्या व्यक्तीला दोषी ठरवले जाईल. अशा सर्व संबंधित कलमांचे संकलन खाली दिले आहे.

## विनय व नीतिमत्ता यांच्याशी संबंधित अपराधांबाबत

### कलम २९२ व २९३

अश्लील लिखाणः अश्लील पुस्तके, नियतकालिके, रेखाटने, रंगीत चित्रे वगैरे प्रकारच्या अश्लील साहित्याची विक्री, वितरण, प्रकाशन किंवा प्रसार करणे या बाबींची दखल ही कलमे घेतात. अशा तऱ्हेची कृती करणे गुन्हा समजला जातो आणि जास्तीत जास्त तीन वर्षेपर्यंत तुरूंगवास व दंड अशा शिक्षेस पात्र ठरू शकतो. त्याच गुन्ह्यासाठी पुन्हा दोषी ठरल्यास जास्तीत जास्त पाच वर्षेपर्यंत तुरूंगवास व दंड अशा शिक्षेस पात्र ठरतो.

या अश्लील साहित्याची विक्री अल्पवयीन मुलांना (२० वर्षे वयाखालील व्यक्ती) केल्यास कलम २९३ अनुसार अधिक कडक ३ वर्षे + दंड - पुन्हा दोषी ठरल्यास ७ वर्षे शिक्षेची तरतूद आहे.

बालक-आधारित अश्लील (लैंगिक) साहित्याबाबत भारतीय दंड संहितेत कुठल्याही स्पष्ट तरतुदी नाहीत.

## मानवी शरीराची दुरवस्था करणा-या अपराधांबाबत

### कलम २९९

**सदोष मनुष्यवधः** मृत्यू घडवणारी कृती ज्या कोणी केली असेल आणि जर

(अ) मृत्यू घडवण्याच्या हेतूने केली असेल, किंवा

(ब) ज्यामुळे मृत्यू घडण्याची शक्यता आहे अशा प्रकारची शारीरिक इजा करण्याच्या हेतूने केलेली असेल, किंवा

(क) अशा प्रकारच्या कृतीमुळे आपल्या हातून मृत्यू घडू शकतो याची माहिती असतानाही केली असेल, तर त्या व्यक्तीने सदोष मनुष्यवधाचा अपराध केलेला आहे.

**कलम ३००**

**खून**ः काही विशिष्ट परिस्थितीतील अपवाद सोडून कोणताही सदोष मनुष्यवध हा खून आहे. जर मृत्यू घडवणारी ती कृतीः

१. (अ) मृत्यू घडवण्याच्या इराद्याने केलेली असेल, किंवा

(ब) आपण ज्या इसमाला इजा करीत आहोत त्यामुळे त्याचा मृत्यू घडण्याची शक्यता आहे याची अपराधकर्त्याला माहिती असूनही तशा प्रकारची इजा हेतुपुरस्सर केलेली असेल, किंवा

(क) सामान्य नैसर्गिक परिस्थितीत कुणाचाही मृत्यू घडण्यास पुरेशी असणारी अशी शारीरिक इजा करण्याच्या हेतूने केलेली असेल, किंवा

(ड) त्या कृतीकर्त्याला हे माहीत असताना की ही बाब अत्यंत धोकादायक असून सर्वथा मृत्यूला कारणीभूत ठरू शकणारी किंवा मृत्यू घडवून आणणारी जीवघेणी इजा करणारी आहे. तरीही मृत्यू घडवण्याची किंवा अशी इजा करण्याची जोखीम घेताना कोणतीही तमा बाळगत नाही. या कलमाच्या पुढील भागात अशा परिस्थितीचा उल्लेख आहे की जेव्हा सदोष मनुष्यवध हा खून मानला जात नाही.

२. अशा प्रकारची गंभीर व आकस्मिक चिथावणी की ज्यामुळे चिथावणीखोराचा मृत्यू घडून येतो.

३. आत्मसंरक्षणाचा हक्क

४. सार्वजनिक न्यायाला पाठबळ देण्यासाठी सार्वजनिक कर्मचा-याकडून कृती घडल्यास

५. अपराधी व्यक्ती क्रूर किंवा असामान्य पध्दतीने वागलेली नसताना आकस्मिक झालेल्या झगड्याच्या वेळी घडल्यास.

६. खुनाची व सदोष मनुष्यवधाची बाब मुलांच्या बाबतीतील लैंगिक दुर्व्यवहार व लैंगिक शोषण या संदर्भात अधिकच महत्त्वाची ठरते. अपराधकर्ता विशिष्ट परिस्थितीत बालकाच्या मृत्यू घडवून आणतो. अशा प्रसंगात सर्वोच्च न्यायालयाने फाशीची सजाही दिलेली आहे.

**कलम ३१७**

मुलाला बचावहीन करून सोडणे व त्याचा परित्याग करणेः बारा वर्षाखालील मुलाला बचावहीन करणे व त्याचा परित्याग करणे यासाठी आईवडिल सात वर्षापर्यंत तुरूंगवास किंवा दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेस पात्र असतात.

बचावहीन अवस्थेत सोडल्यामुळे जर बालक मरण पावले तर खून किंवा सदोष मनुष्यवधाच्या खटल्यामध्ये या कलमाचा वापर बचाव म्हणून करता येणार नाही.

## इजा करण्याबाबत

**कलम ३१९**

**इजाः** जो कोणी इतर कोणालाही शारीरिक पीडा देतो, दुखणे किंवा व्यंग निर्माण करतो तो इजाकर्ता ठरतो.

**कलम ३२०**

**गंभीर इजाः** गंभीर इजा म्हणून ठरणा-या आठ प्रकारच्या इजांचा यात समावेश होतो.ः

१. पौरुषहीन करणे
२. डोळा नष्ट करणे
३. कानाची ऐकण्याची शक्ती नष्ट करणे
४. एखादा अवयव किंवा सांधा निकामी करणे
५. एकाद्या अवयवाची / सांध्याची ताकत नाहीशी करणे किंवा त्यात बाधा उत्पन्न करणे
६. डोके किंवा चेहरा कायमचा विरूप करणे
७. हाड किंवा दात तुटणे किंवा निखळणे
८. तीव्र शारीरिक वेदना देणारी, वीस दिवसांपर्यंत पीडा चालू राहणारी व जिच्यामुळे व्यक्ती नित्याचे व्यवहार करण्यास असमर्थ ठरते अशी कोणतीही इजा.

कलम ३२१ ते ३२८ विकोपाला जाणा-या इजा तसेच गंभीर इजा यांची प्रकरणे हाताळतात. बालकांच्या लैंगिक दुर्व्यवहाराच्या बाबतीत तसेच लैंगिक सौदेबाजीच्या बाबतीत अपराधकर्ता यातील काही अपराध या ना त्या स्वरूपात करतोच.

## अन्याय्य नियंत्रण व अन्याय्य डांबवणूक यांच्याबाबत

**कलम ३३९ व ३४१**

**अन्याय्य नियंत्रणः** आपल्याला हव्या त्या दिशने जाण्याचा हक्क असतानाही त्या व्यक्तीला एखाद्या दिशने जाण्यास प्रतिबंध करणे म्हणजे अन्याय्य नियंत्रण होय. एकाद्या व्यक्तीवर अन्याय्य नियंत्रण आणणे ही बाब एक महिन्यापर्यत तुरूंगवास किंवा दंड किंवा दोन्ही, अशा प्रकारच्या शिक्षेस पात्र आहे.

**कलम ३०४ व ३४२**

**अन्याय्य डांबवणूकः** घालून दिलेल्या विशिष्ट मर्यादेच्या घेरापलीकडे कुठेही जाण्यास एखाद्या व्यक्तीला प्रतिबंध करणे म्हणजे डांबवणूक होय. अन्याय्य डांबवणूक ही बाब एक वर्षापर्यंत तुरूंगवास, किंवा दंड किंवा दोन्ही अशा प्रकारच्या शिक्षेस पात्र आहे. ही दोन्ही कलमे साध्या प्रसंगांची हाताळणी करतात, तर कलमे ३४३ ते ३४८ अन्याय्य डांबवणुकीची विकोपाची प्रकरणे हाताळतात.

ही कलमे मुलांच्या बाबतीतील लैंगिक दुर्व्यवहार व सौदेबाजी या संदर्भातही महत्त्वाचे आहेत कारण दुर्व्यवहाराच्या जोडीने मुलांना अन्याय्य नियंत्रण व अन्याय्य डांबवणूक यांना तोंड द्यावे लागते.

**कलम ३५४**

**स्त्रीचा विनयभंग करणेः** एखाद्या स्त्रीवर तिचा विनयभंग करण्याच्या हेतूने आक्रमण करणे किंवा गुन्हेगारी शक्तीचा वापर करणे या बाबी दोन वर्षांपर्यंत तुरूंगवास किंवा दंड किंवा दोन्ही, अशा प्रकारच्या शिक्षेस पात्र आहे. बलात्काराच्या गुन्ह्यासाठी लिंगप्रवेश झालेला नाही अशा प्रकरणात हे कलम लागू होते. यामध्ये कुरवाळणे, चुंबन घेणे, तसेच मुखमैथुन यांचा समावेश होतो.

## पळवून नेणे, अपहरण, गुलामगिरी व वेठबिगारी यांच्याबाबत

**कलम ३५९**

**पळवून नेणेः** पळवून नेणे हे दोन प्रकारचे असते.

- भारतातून पळवणे (भा. दं. कलम ३६० अंतर्गत) व
- कायदेशीर पालकांपासून पळवणे (भा. दं. कलम ३६३ अंतर्गत) वरील पळवून नेण्याचे दोन्ही प्रकार कलम ३६३ अनुसार जास्तीत जास्त ७ वर्षांपर्यंत तुरूंगवास व दंड अशा शिक्षेस पात्र आहेत.

**कलम ३६२**

**अपहरणः** एखाद्या व्यक्तीला एका ठिकाणाहून दुसरीकडे जायला लावण्यासाठी जबरदस्तीचा किंवा फसवणुकीच्या मार्गाचा उपयोग करणे म्हणजे अपहरण होय.

मुलांच्या सौदेबाजीच्या संदर्भात पळवून नेणे व अपहरण करणे या दोन्ही गोष्टी विशेष महत्त्वाच्या आहेत. या अपराधासंबंधातील विकोपाचे प्रकार कलम ३६३ A ते ३७४ यामध्ये समाविष्ट केले आहेत.

१. अल्पवयीन मुलाला भीक मागायला लावण्याच्या उद्देशाने पळवणे अथवा अपंग बनवणे (कलम ३६३)

२. ठार मारण्यासाठी पळवून नेणे वा अपहरण करणे (कलम ३६४)

३. खंडणीसाठी पळवणे (कलम ३६४)

४. एखाद्या व्यक्तीला गुप्तपणे व अन्यायाने डांबून ठेवण्याच्या उद्देशाने पळवणे वा अपहरण करणे (कलम ३६५)

५. विवाह करण्यासाठी एखाद्या स्त्रीला पळवणे, अपहरण करणे, भुलवणे किंवा सक्ती करणे (कलम ३६६)

६. एकाद्या व्यक्तीला गंभीर इजा करण्यासाठी, जबरदस्तीने मजुरीसाठी वगैरे पळवणे किंवा अपहरण करणे (कलम ३६७)

७. पळवलेल्या किंवा अपहरण केलेल्या व्यक्तीला अन्यायकारकपणे लपवून किंवा डांबून ठेवणे(कलम ३६८)

८. शरीरावरील चीजवस्तूंची चोरी करण्याच्या हेतूने दहा वर्षाखालील मुलाला पळवणे वा अपहरण करणे (कलम ३६९)

९. एकाद्या व्यक्तीची गुलाम म्हणून खरेदी किंवा विक्री करणे (कलम ३७०)

१०. गुलामांचा नित्य नेहमीचा व्यापार (कलम ३७१)

**कलम ३६६ A**

अल्पवयीन मुलीला कह्यात घेणे. अठरा वर्षाखालील अल्पवयीन मुलीला अशी कृती करण्यासाठी फूस लावणे की ज्यायोगे दुस-या व्यक्तीबरोबर अवैध संभोग करण्यास तिच्यावर सक्ती होईल किंवा त्यासाठी तिला मोहात पाडले जाईल ही बाब जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंत तुरूंगवास व दंड अशा शिक्षेस पात्र आहे.

**कलम ३६६ B**

परक्या देशातून मुलींची आयातः परक्या देशातून किंवा जम्मू-काश्मीर मधून एकवीस वर्षाखालील मुलीला अशा हेतूने भारतात आणणे की दुस-या व्यक्तीबरोबर अवैध संभोग करण्यास तिच्यावर सक्ती करता येईल किंवा तिला मोहात पाडता येईल. ही बाब जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंत तुरूंगवास व दंड अशा शिक्षेस पात्र आहे.

**कलम ३७२**

अल्पवयीन मुलीला देहव्यवसायासाठी विकणेः अठरा वर्षाखालील मुलीला देहव्यवसायाच्या किंवा एखाद्या दुस-या व्यक्तीशी अवैध संभोग करण्याच्या किंवा इतर कोणत्याही अवैध वा अनैतिक हेतूने विकणे किंवा भाड्याने घेणे ही जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंत तुरूंगवास व दंड अशा शिक्षेस पात्र आहे.

**कलम ३७३**

देहव्यवसायासाठी अल्पवयीन मुलीची खरेदी करणेः अठरा वर्षाखालील व्यक्तीला देहव्यवसायाच्या किंवा दुस-या व्यक्तीशी अवैध संभोग करण्याच्या हेतूने किंवा इतर कोणत्याही अवैध वा अनैतिक हेतूने विकत घेणे किंवा भाड्याने घेणे ही बाब जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंत तुरूंगवास व दंड अशा शिक्षेस पात्र आहे.

## लैंगिक गुन्हे

**कलम ३७५**

**बलात्कारः** जेव्हा एखादा पुरुष एखाद्या स्त्रीशी खालील परिस्थितीत लैंगिक संभोग करतो तेव्हा तो बलात्कार असतो.

१. त्या स्त्रीच्या इच्छेविरुध्द
२. तिच्या अनुमतीशिवाय
३. तिच्या अनुमतीने, पण ती अनुमती तिला किंवा तिला प्रिय अशा व्यक्तीला मृत्यूची किंवा इजा करण्याची भीती घालून मिळवलेली असेल तर
४. तिच्या अनुमतीनेच, पण जर ती त्याला आपला पती समजते आहे
५. तिच्या अनुमतीनेच, पण ती अनुमती मनाच्या असंतुलित अवस्थेमुळे, किंवा नशेच्या धुंदीमुळे किंवा तिला दिलेल्या अशा पदार्थामुळे की ज्यायोगे आपल्या कृतीचे स्वरूप आणि परिस्थिती समजण्यास ती असमर्थ आहे अशा स्थितीत दिली गेली असेल तर

६. जर ती वयाने सोळा वर्षापेक्षा कमी असेल तर मग अनुमतीने असो की अनुमतीशिवाय लैंगिक संभोग घडण्यासाठी योनीमध्ये लिंगप्रवेश होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पंधरा वर्षाखालील पत्नीशी पुरुषाने (पतीने) केलेला लैंगिक संभोग हा बलात्कार मानला जातो.

- बलात्कार सिध्द करण्यासाठी लिंग प्रवेश झालेला असणे महत्त्वाचे आहे.
- अगदी माफक प्रमाणातील लिंग प्रवेशही बलात्कार ठरू शकतो.
- लिंगप्रवेश होण्यासाठी पडदा फाटणे गरजेचे नाही.
- वीर्य बाहेर पडलेले असण्याचीही गरज नाही.
- सर्वसामान्यतः बलात्कार झाला आहे या संबंधात त्या स्त्रीच्या साक्षीबरोबर वैद्यकीय पुराव्याची गरज असते.

**कलम३७६**

**जर खालील व्यक्तींनी बलात्कार केला तर अधिक कडक शिक्षा होतेः**

१. पोलीस अधिकारी

२. सार्वजनिक कर्मचारी
   (अ) तुरूंग, निरीक्षण गृह किंवा कायद्यानुसार स्थापन केलेली इतर निवारा व्यवस्था किंवा बालकांसाठीच्या संस्था या ठिकाणचे कर्मचारी व त्यांची व्यवस्थापक मंडळे.
   (ब) जर बारा वर्षाखालील स्त्रीवर बलात्कार झाला असेल तर,
   (क) सामूहिक बलात्कार झाला असेल तर

३. रूग्णालयाचे व्यवस्थापन किंवा कर्मचारी

४. एखादी स्त्री गरोदर आहे हे माहीत असतानाही बलात्कार केल्यास

५. बारा वर्षाखालील मुलीवर बलात्कार

६. सामूहिक बलात्कार

याबाबतीत दहा वर्षांचा तुरूंगवास ही किमान शिक्षा आहे. ती जन्मठेपेइतकीही वाढू शकते. (मात्र न्यायालय पुरेशा व विशेष कारणांसाठी शिक्षेची मुदत दहा वर्षापेक्षा कमी करू शकते. अर्थात त्यांनी त्या कारणांचा उल्लेख करावा अशी अपेक्षा आहे.)

**कलम ३७७**

**अनैसर्गिक गुन्हेः** एखाद्या पुरुषाशी, स्त्रीशी किंवा प्राण्याशी निसर्गक्रमाविरुध्द वैषयिक संभोग केल्यास तो जन्मठेप किंवा जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंत तुरूंगवास व दंड अशा शिक्षेस पात्र आहे.या कलमानुसार समलिंगी संभोग हा शिक्षापात्र आहे. त्यामुळे मुलगा असलेल्या बालकाशी झालेल्या लैंगिक दुर्व्यवहाराचा समाचार कायद्यातील या तरतुदीमुळे घेतला जातो. सदर गुन्हा घडण्यासाठी गुदव्दारात लिंगप्रवेश किंवा तोंडामध्ये लिंगप्रवेश झालेला असणे गरजेचे आहे.

हे कलम महत्त्वाचे आहे, कारण बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये पुरुषाने पुरुषावर केलेल्या बलात्काराचा समावेश नाही. त्यामुळे या कलमाचा उपयोग पुल्लिंगी बालकांच्या बाबतीतील लैंगिक दुर्व्यवहारासाठी केला जातो. लैंगिक कृती राजीखुशीने झाली की अनुमतीशिवाय यामध्ये हे कलम कोणताही फरक करत नाही.

## गुन्हेगारी स्वरूपाची धमकी, अपमान व छळ यांच्याबाबत

**कलम ५०९**

**स्त्रियांचा विनयभंग करण्याच्या हेतूने उच्चारलेला शब्द, केलेला हावभाव किंवा कृतीः** जो कोणी स्त्रीचा विनयभंग करण्याच्या हेतूने एखादा शब्द उच्चारतो, काही आवाज, हावभाव करतो किंवा काही वस्तूंचे प्रदर्शन अशा उद्देशाने करतो की शब्द वा आवाज अशा स्त्रीकडून ऐकला जाईल किंवा तो हावभाव वा वस्तू पाहिली जाईल किंवा त्या स्त्रीच्या एकांतावर आक्रमण करेल. त्याला यासाठी एक वर्षापर्यंतची साधी कैद वा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

## गुन्हे करण्याच्या प्रयत्नांबाबत

**कलम ५११**

**गुन्हे करण्याचा प्रयत्नः** या संहितेनुसार शिक्षापात्र असलेला कोणताही गुन्हा करण्याचा प्रयत्न हाही गुन्हा आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यात खालीलपैकी कशाचाही समावेश असू शकेलः

अ) जर गुन्हा जन्मठेपेच्या शिक्षेयोग्य असेल, तर अशा तऱ्हेचा गुन्हा करण्याचा प्रयत्न जन्मठेपेच्या निम्म्या कालावधीइतका शिक्षापात्र आहे.

ब) कोणत्याही प्रकारच्या / कालावधीच्या तुरूंगवासासाठी शिक्षापात्र असलेला गुन्हा करण्याचा प्रयत्न हा त्या गुन्ह्यासाठी तरतूद केलेल्या शिक्षेच्या कालावधीतील जो सर्वात दीर्घ कालावधी असेल त्याच्या निम्मा काळ शिक्षापात्र आहे.

क) दंडः गुन्ह्यासाठी जेवढा दंड असेल, तेवढाच

ड) दोन्ही (दंड तसेच तुरूंगवास)

**बाल न्याय कायदा १९८६ -** हा संपूर्ण देशाला लागू होणारा कायदा मुलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भातला मैलाचा दगड म्हणावा लागेल. दुर्दैवाने बरीच वर्षं त्याची अंमलबजावणीच झाली नाही.

यानंतरच्या काळात बाल न्याय कायदा १९८६ मध्ये काही बदल केले गेले आणि त्याचे नाव सन २००० मध्ये **बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा-२०००** असे बदलण्यात आले. याचेच रूपांतर सन २००६ मध्ये **बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) दुरुस्ती कायदा २००६** असे झाले. यामध्ये मुख्यतः काळजी व संरक्षणाची गरज असलेली मुले आणि कायद्याच्या विरोधात वागणारी मुले असे दोन विभाग याच कायद्याखाली करून त्यांच्यासाठी दोन वेगळ्या व्यवस्था अस्तित्वात आल्या. बाल कल्याण समिती काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी तर बाल न्याय मंडळ कायद्याच्या विरोधात वागलेल्या मुलांसाठी.

या मधल्या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवरही मुलांच्या सुरक्षिततेच्या, परिपूर्ण विकासाच्या दृष्टीने पावले उचलली गेली.

**बाल हक्क संहिता**

संयुक्त राष्ट्र परिषदेने २० नोव्हेंबर, १९८९ साली बालहक्क संहिता मंजूर केली. भारताने ११ डिसेंबर, १९९२ साली त्यावर सही करून मान्यता दिली. या संहितेच्या व्याख्येनुसार १८वर्षाखालील व्यक्ती म्हणजे मूल.

ही संहिता म्हणजे मुलांच्या हक्कांची अतिशय काटेकोर आणि योग्य भाषेत केलेली सविस्तर यादी आहे.

ढोबळ मानाने मुलांच्या हक्कांचे चार भाग दिसतातः

१. मुलांचा जगण्याचा हक्क
२. मुलांचा विकासाचा हक्क
३. मुलांचा सहभागाचा हक्क
४. मुलांचा सुरक्षिततेचा हक्क

मूल सुरक्षित असेल तर जगेल, त्याला सुरक्षित वाटेल तर त्याच्या क्षमतेचा पूर्ण विकास होऊ शकेल तसे झाल्यास त्याच्या जगण्याशी संबंधित निर्णयामध्ये सहभागी होण्याची त्याची क्षमता विकसित होऊ शकेल. याचा अर्थ सुरक्षिततेचा हक्क हा सर्व हक्कांचा पाया आहे किंवा सुरक्षितता हा सर्व हक्कांना एकत्र ठेवणारा धागा आहे असे म्हणावयास हरकत नसावी.

११ डिसेंबर १९९२ साली बाल हक्क संहितेला मान्यता दिल्यावर २० वर्षांनी मुलांवरील 'लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण' हा कायदा अस्तित्वात येत आहे.

* * * * * * * * * *

## द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफोन्सिस ॲक्ट - २०१२

हा कायदा जम्मू आणि काश्मीर सोडून संपूर्ण भारताला लागू होतो.

१९ जून २०१२ ला राष्ट्रपतींची अनुमती मिळाल्यानंतर हा कायदा २० जून २०१२ रोजी सरकारी अधिकृत पत्रिकेद्वारे जनतेच्या माहितीसाठी प्रसिध्द झाला आणि १४ नोव्हेंबर २०१२ रोजी याचे मध्यवर्ती सरकारने बनवलेले नियमही सरकारी अधिकृत पत्रिकेद्वारे प्रसिध्द झाले.

### प्रकरण पहिले

कायद्यात वापरलेल्या खालील वैशिष्ट्यपूर्ण शब्दांच्या व्याख्या या प्रकरणात दिल्या आहेत.

- अत्यंत गंभीर स्वरूपाचा लिंग प्रवेशाचा लैंगिक अत्याचार
- अत्यंत गंभीर स्वरूपाचा लैंगिक आघात
- लिंगप्रवेशाचा अत्याचार
- लैंगिक आघात
- लैंगिक छळ
- विशेष न्यायालये
- विशेष सरकारी वकील

इतर व्याख्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांप्रमाणेच आहेत. (कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर -१९७३, जुवेनाइल जस्टिस ॲक्ट -२००० आणि इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट - २०००).

### प्रकरण दुसरे

**लिंग प्रवेशाचा (Penetrative) लैंगिक अत्याचार - कलम ३**

- योनीमार्ग, मूत्रमार्ग किंवा गुदामध्ये लिंग-प्रवेश म्हणजे लिंग-प्रवेशाचा अत्याचार. परंतु या कायद्याप्रमाणे आता कोणतीही वस्तू, अंगाचा कोणताही भाग मुलीचा योनीमार्ग, मुलीचा / मुलाचा मूत्रमार्ग किंवा गुदामध्ये सरकवणे किंवा मुलीला / मुलाला तसे करायला लावणे ही कृती याच अत्याचारात धरली जाईल.

- लिंगप्रवेशाच्या हेतूने मुलाच्या शरीराचा कोणताही भाग उत्तेजित होण्यासारखा हाताळणे किंवा मुलाला तसे करावयास लावणे.
- मुलाचे लिंग, योनी, मूत्रमार्ग किंवा गुदा या अवयवांना तोंड लावणे किंवा मुलाला तसे करावयास भाग पाडणे

**शिक्षाः** वरील गुन्ह्यांसाठी किमान ७ वर्षे सश्रम किंवा साधा कारावास जो आजीवन कारावासातही बदलू शकतो. शिवाय दंड होऊ शकतो.

**गंभीर स्वरूपाचा लिंगप्रवेशाचा लैंगिक अत्याचार - कलम ५**

१) पोलीस अधिकारी जेव्हा असा अत्याचार करतो- त्याच्या कार्यक्षेत्रात असताना, ड्यूटीवर असताना किंवा नसताना, गणवेश असताना किंवा नसताना जिथे तो पोलीस अधिकारी म्हणून ओळखला जातो.

२) लष्करातील किंवा सुरक्षा दलातील व्यक्तीने या प्रकारचा लैंगिक अत्याचार केला असता तो त्याच्या कार्यक्षेत्रात असताना किंवा नसताना, ड्यूटीवर असताना किंवा नसताना, गणवेश असताना किंवा नसताना जिथे तो लष्करातील किंवा सुरक्षा दलातील अधिकारी म्हणून ओळखला जातो.

३) सरकारी नोकर उदा. तुरूंगातील कर्मचारी, रिमांड होम, सुरक्षा गृह, निरीक्षण गृह किंवा कायद्याने मुलांना ठेवण्यासाठी, काळजी घेण्यासाठी निश्चित केलेली कोणतीही जागा अशा ठिकाणच्या मुलांसोबत गंभीर स्वरूपाचा लिंगप्रवेशाचा अत्याचार करतो.

४) सरकारी किंवा खाजगी हॉस्पिटलचा कर्मचारी किंवा व्यवस्थापक त्या हॉस्पिटलमधील मुलावर असा अत्याचार करेल तर

५) शिक्षण संस्था किंवा धार्मिक संस्थेशी संबंधित व्यक्ती मुलावर अशा प्रकारचा अत्याचार करेल तर

६) जेव्हा एक गट सामूहिक लिंगप्रवेशाचा अत्याचार करण्यासाठी अशा कृतीमध्ये सहभागी होतो तेव्हा प्रत्येकाला तेवढेच दोषी समजले जाईल.

७) भयंकर शस्त्र, आग, गरम पदार्थ किंवा कोणतीही त्रासदायक वस्तू घेऊन मुलाच्या शरीराला किंवा लैंगिक अवयवाला इजा करतो.

८) ज्या कारणांमुळे मूल मनोरूग्ण बनेल किंवा त्याच्या असलेल्या क्षमतांवर दुष्परिणाम होईल, मूल काही काळासाठी किंवा कायमचे काही नेहमीच्या कृती करू शकणार नाही.

९) या अत्याचारामुळे मुलगी गरोदर राहिली असेल तर.

१०) या अत्याचारामुळे मुलाला एच्. आय्. व्ही. ची किंवा जीवनाला धोका असलेल्या दुस-या कोणत्याही रोगाची लागण झाली असता.

११) मुलाच्या अपंगत्वाचा फायदा घेऊन असा लैंगिक अत्याचार केला असता.

१२) एकाहून अधिक वेळा मुलावर लिंगप्रवेशाचा अत्याचार केला असता.

१३) १२ वर्षाखालील मुलाबरोबर असा लैंगिक अत्याचार केला असता.

१४) रक्ताचे नाते असेल, दत्तक विधीमुळे अगर लग्नामुळे नाते निर्माण झाले असेल, पालकत्व स्वीकारलेल्या व्यक्तीने अथवा त्याच घरात रहाणा-या व्यक्तीने लिंगप्रवेशाचा अत्याचार केला असता.

१५) मुलांना सेवा पुरवणा-या संस्थेची प्रमुख व्यक्ती, व्यवस्थापक मंडळातील व्यक्ती अथवा कर्मचारी यांनी असा अत्याचार केला असता.

१६) मुलाचा विश्वास असलेल्या किंवा मुलावर अधिकार असलेल्या व्यक्तीने असा अत्याचार केला असता.

१७) मुलगी गरोदर आहे हे माहीत असताना तिच्यावर असा अत्याचार केला असता.

१८) लिंगप्रवेशाचा अत्याचार करून मुलाला / मुलीला मारून टाकण्याचा प्रयत्न केला असता.

१९) जातीय किंवा वांशिक दंगलीचा फायदा घेऊन असा अत्याचार केला असता.

२०) त्या व्यक्तीला यापूर्वीही अशा प्रकारच्या गुन्ह्यासाठी शिक्षा झालेली असेल तर...

२१) मुलावर लिंगप्रवेशाचा अत्याचार करून मुलाला नग्न करून त्याची धिंड काढली असता.

**शिक्षाः** सश्रम कारावास किमान १० वर्षे किंवा आजीवनही असू शकतो + दंड

**लैंगिक आघात आणि शिक्षा - कलम ७**

लैंगिक भावनेने योनीमार्ग, लिंग, गुदा किंवा छातीला स्पर्श करणे किंवा मुलाला तसे करण्यासाठी प्रवृत्त करणे. इतर कोणतीही लैंगिक भावनेने केलेली कृती ज्यामध्ये स्पर्श आहे पण लिंगप्रवेश नाही.

**शिक्षाः** किमान ३ वर्षे सश्रम किंवा साधा कारावास ५ वर्षापर्यंत वाढू शकतो + दंड

**गंभीर स्वरूपाचा लैंगिक आघात - कलम ९**
कलम ५च्या अंतर्गत येणारे अत्याचार वगळता सर्व या अत्याचारामध्ये मोडतात.

**शिक्षाः** सश्रम किंवा साधा कारावास ५ ते ७ वर्षे + दंड

**लैंगिक छळ - कलम ११**

- लैंगिक भावनेने शब्द उच्चारणे, आवाज करणे, हावभाव करणे किंवा लैंगिक अवयवाचे प्रदर्शन करणे
- मुलाला लैंगिक अवयव दाखवण्यास प्रवृत्त करणे
- अश्लील हेतूने मुलाला वस्तू अथवा साहित्य दाखविणे
- मुलाचा पाठलाग करणे किंवा मुलाकडे एकटक पहात रहाणे (यात प्रत्यक्ष किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापरही असू शकतो.)
- मुलाबरोबरच्या ख-या अथवा खोट्या लैंगिक कृतीचे फोटो किंवा चित्रफीत यांचा धमकीसाठी उपयोग करणे

**शिक्षाः** या गुन्हासाठी ३ वर्षापर्यंतचा कारावास + दंड

## प्रकरण तिसरे - कलम १३ व १५

- छापील साहित्य, चित्रफीत, संगणक किंवा इतर कोणत्याही तंत्रज्ञानाचा वापर करून अश्लील साहित्य बनविण्यासाठी मुलाचा वापर करणे
- अशा प्रकारचे साहित्य तयार करणे, वितरित करणे, प्रसिध्द करणे, वितरणाला साहाय्यभूत होणे

**शिक्षाः**

- ५ वर्षापर्यंत कारावास + दंड
- दुस-यांदा किंवा अधिक वेळा गुन्हा शाबीत झाल्यास ७ वर्षापर्यंत कारावास + दंड
- हे करणारी व्यक्ती अश्लील कृतीत स्वतः सहभागी असेल तर १० वर्षे किंवा आजीवन कारावास + दंड
- या प्रकारचे साहित्य ठेवणा-या / साठवणा-या व्यक्तीलाही ३ वर्षेपर्यंत सजा + दंड

## प्रकरण चौथे - कलम १६ व १८

### गुन्हा करणे किंवा गुन्ह्यासाठी उत्तेजन देणे

गुन्हा करण्यास उत्तेजन देणे, गुन्हा करण्याच्या कटात सामील असणे, मदत करणे (कटात सामील परंतु गुन्ह्याचा प्रयत्न यशस्वी नाही)

**शिक्षाः** १ वर्षाचा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही.
या प्रकारचा गुन्हा यशस्वी झाला असल्यास १० वर्षे कारावास + दंड.

## प्रकरण पाचवे

### या प्रकरणात अशा गुन्ह्यांची माहिती देण्याची प्रक्रिया कशी असेल हे सांगितले आहे - कलम १९ ते २३

माहिती देणारी व्यक्ती मूल असेल तर त्याला समजेल अशी सोपी भाषा वापरली जावी. पीडित मूल किंवा माहिती देणा-यास आपली भाषा समजत नसेल (किंवा त्याची आपल्याला) तर भाषा येणा-या व्यक्तीची मदत घेतली जावी.

असा गुन्हा झाल्याची माहिती असलेल्या किंवा होण्याची शक्यता जाणवलेल्या व्यक्तीने ती विशेष बाल पोलीस पथक किंवा स्थानिक पोलीस ठाण्यातील बाल पोलीस अधिकारी यांना कळवणे बंधनकारक आहे. अशा गुन्ह्याची माहिती लपवली किंवा खोटी तक्रार केली तर त्यासाठीही शिक्षेची तरतूद आहे.

अशा गुन्ह्याची माहिती असेल किंवा शक्यता वाटली तर मुलाने म्हणजे १८ वर्षाखालील व्यक्तीने तक्रार नोंदवावी अशी अपेक्षा असली तरी त्याने तसे केले नाही तरी त्याला शिक्षा नाही.

विशेष बाल पोलीस पथक (ज्युवेनाइल पोलीस युनिट) किंवा स्थानिक पोलीस ठाण्यातील बाल पोलीस अधिका-याकडे तक्रार आली आणि अत्याचार झालेल्या मुलाला काळजी घेतली जाण्याची आणि संरक्षणाची गरज आहे अशी त्यांची खात्री पटली, तर कारणांची लिखित नोंद करून मुलाला २४ तासाच्या आत निवासी संस्थेत किंवा जवळच्या हॉस्पिटलमध्ये गरजेनुसार दाखल करण्याची कारवाई करणे बंधनकारक आहे.त्या प्रकरणाची तसेच केलेल्या कारवाईची माहिती बाल कल्याण समितीला, विशेष कोर्टाला आणि ते नसल्यास सेशन्स कार्टाला २४ तासात कळवणेही बंधनकारक आहे.

प्रसारमाध्यमे, हॉटेल, लॉज किंवा फोटो स्टुडिओ यांच्यासाठीही अशा घटनेची माहिती असल्यास पोलिसांना कळवणे बंधनकारक आहे.

## प्रकरण सहावे

**जबाब / साक्ष नोंदविण्याची प्रक्रिया - कलम २४ ते २७**

- मुलाचा जबाब मुलाला सुरक्षित वाटेल अशा जागी, गणवेशात नसलेल्या महिला सब-इन्स्पेक्टरने मुलाचे पालक किंवा विश्वासातल्या माणसाच्या उपस्थितीत नोंदवावा. ही नोंद समाधानकारक न वाटल्यास न्यायाधीश स्वतः मुलाशी बोलून साक्ष नव्याने नोंदवू शकतात.
- मुलामध्ये काही अपंगत्व असेल तर न्यायाधीश त्या बाबतीतल्या प्रशिक्षित व्यक्तीची मदत घेऊ शकतात.
- पीडित मुलाचा जबाब नोंदविताना (IPC प्रमाणे) आरोपीच्या वकिलास हजर रहाण्याची परवानगी नाही.
- पोलिसांनी दाखल केलेल्या अंतिम अहवालाची प्रत न्यायाधीशांनी मुलाला किंवा त्याच्या प्रतिनिधीला देणे बंधनकारक आहे.
- आरोपी पीडित मुलाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी चौकशी करणा-या अधिका-याने घेणे अनिवार्य आहे.
- मुलाची वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक (प्रथम माहिती अहवाल नोंदवला नसला तरी)
- शक्य तेव्हा दृक्-श्राव्य माध्यमाचाही उपयोग जबाब नोंदवताना केला जावा.

## प्रकरण सातवे

**विशेष न्यायालयाची तरतूद - कलम २८ ते ३२**

प्रत्येक जिल्ह्यातल्या एका सेशन्स न्यायालयाला विशेष न्यायालयाचा दर्जा दिला जाईल. राज्य शासन उच्च न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधिशांशी सल्ला मसलत करून हे ठरवेल. राज्य सरकार प्रत्येक विशेष न्यायालयासाठी विशेष सरकारी वकिलाची नेमणूक करेल. किमान ७ वर्षे वकिलीचा अनुभव असलेल्या व्यक्ती या पदासाठी पात्र समजल्या जातील.

- मुलाला आक्रमक प्रश्न विचारले जाणार नाहीत व त्याला सन्मानाने वागवले जाईल.

- या प्रकरणात आरोपीने इतरही काही गुन्हे केले असतील तर विशेष न्यायालय त्याचीही दखल घेऊ शकते.
- मुलाच्या बाबतीत लैंगिक गुन्हा केल्याचा फौजदारी खटला एखाद्या व्यक्तीवर दाखल झाला असेल तर जोपर्यंत त्याने तो केला नाही हे सिध्द होत नाही तोपर्यंत त्याने तो गुन्हा केला आहे असे विशेष न्यायालय गृहीत धरेल.
- मुलाचा जबाब व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे किंवा एकतर्फी आरसा, पडदा किंवा उपलब्ध असलेल्या योग्य त्या वस्तूचा वापर करून घेतला जावा, जेणे करून मुलावर दबाव येणार नाही व ते मोकळेपणाने बोलेल.
- न्यायालयाचे कामकाज इन कॅमेरा म्हणजेच खुल्या कोर्टात न होता न्यायाधिशांच्या चेंबरमध्ये केले जाईल. मुलाचे पालक किंवा विश्वासातल्या माणसाला यावेळी मुलासोबत रहाण्याची परवानगी असेल. प्रकरण विशेष न्यायालयाकडे आल्यावर ३० दिवसात पुरावे नोंदवले जातील आणि एका वर्षाच्या आत प्रकरणांचा निकाल लावण्याचा प्रयत्न केला जाईल.
- कायदेशीर शिक्षेव्यतरिक्त विशेष प्रकरणात न्यायालय आरोपीला मुलाचे पुनर्वसन किंवा उपचारासाठी थेट आर्थिक तरतूद करण्यास सांगू शकते.
- पालकांना जरूर वाटल्यास ते आपल्या मर्जीने स्वतंत्र वकीलही नेमू शकतात.

अत्याचार १८ वर्षाखालील मुलाने केला असल्यास ते प्रकरण बाल न्याय अधिनियम (मुलांची काळजी आणि संरक्षण २००० - २००६) या कायद्याकडे वर्ग केले जाईल.

## प्रकरण आठवे

### विशेष न्यायालयाची प्रक्रिया, अधिकार आणि पुराव्याची नोंद करणे
### कलम ३३ ते ३८

- आरोपीचे वकील आपले प्रश्न न्यायालयाकडे देतील आणि न्यायाधीश ते मुलाला विचारतील.
- न्यायालयाच्या कामकाजादरम्यान मुलाला गरज आहे असे जाणवल्यास न्यायाधीश मुलासाठी अधून मधून विश्रांतीची सोय करू शकतात.
- मुलाला मोकळे वाटेल असे मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करण्याचा न्यायालय प्रयत्न करेल.
- पालक किंवा विश्वासातल्या व्यक्तीला मुलासोबत असण्याची परवानगी असेल.
- साक्षीसाठी मुलाला वारंवार बोलावले जाणार नाही.

# प्रकरण नववे

## संकीर्ण किंवा इतर बाबी - कलम ३९ ते ४६

- राज्य सरकार खटल्याच्या कामकाजापूर्वी व तो चालू असताना मुलाला मदत करण्यासाठी असलेल्या तज्ज्ञांसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करेल.
- मुलाच्या वैद्यकीय तपासणीसाठी पालक किंवा पालकत्व स्वीकारलेल्या व्यक्तीची संमती घेतली जाईल.
- आरोपीने केलेल्या गुन्ह्यासाठी इतर कोणत्याही कायद्यात अधिक कडक शिक्षा असेल तर ती दिली जाईल.
- या कायद्याबद्दलच्या जनजागृतीसाठी दूरदर्शन, रेडिओ किंवा इतर माध्यमांचा नियमित वापर केला जाईल. ही जबाबदारी राज्य सरकार तसेच मध्यवर्ती सरकारचीही असेल.
- संबंधित अधिका-यांना आणि इतर व्यक्तींना वेळोवेळी या कायद्याचे प्रशिक्षण दिले जावे.
- मध्यवर्ती सरकार या कायद्याचे नियम बनवेल. (१४ नोव्हेंबर २०१२रोजी हे नियम सरकारी अधिकृत पत्रिकेद्वारे प्रसिध्द झाले आहेत.)
- या कायद्याची अंमलबजावणी होते की नाही हे पहाण्याची जबाबदारी राष्ट्रीय बाल अधिकार आयोग, राज्यस्तरीय बाल अधिकार आयोग आणि मुलांच्या हक्कांचे संरक्षण कायदा - २००५ यांची असेल.
- हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर घडलेल्या गुन्ह्यांचीच दखल या कायद्याने घेता येईल.
- दोन्ही सभागृहांचे एकमत झाल्यास न्याय मिळण्यात अडसर झालेले नियम कायदा लागू झाल्यापासून २ वर्षाच्या आत बदलता येतील. सरकारी दप्तरात मध्यवर्ती सरकार अशा बदलांचे अध्यादेश जारी करू शकते.

**********

## या कायद्यावर चर्चा करताना लक्षात आलेले मुद्दे

**सकारात्मकः**

१. ब-याच वर्षांपासून मुलांवरील लैंगिक अत्याचाराबाबत स्वतंत्र कायदा हवा अशी या प्रश्नावर काम करणा-या कार्यकर्त्यांची मागणी होती ती या कायद्याने पूर्ण झाली.

२. या कायद्यात मुलांवरील लैंगिक अत्याचाराची व्याख्या लिंगभाव (जेंडर) निरपेक्ष केली आहे. म्हणजेच तरतुदी करताना मुलगी, मुलगा असा भेद केलेला नाही.

३. स्पर्शाद्वारे आणि स्पर्शाशिवाय होणा-या सर्व प्रकारच्या अत्याचारांचा यात समावेश केलेला आहे.

४. गुन्ह्याच्या गांभिर्यावर आधारित शिक्षा सुचविली गेली आहे.

५. पोलीस, लष्करी अधिकारी, सुरक्षा अधिकारी, हॉस्पिटल, शैक्षणिक व धार्मिक संस्था, मुलांच्या संस्थांतील पदाधिकारी, कर्मचारी यांचा स्वतंत्र स्पष्ट उल्लेख आणि अधिक कडक सजा सुनावली आहे.

६. खटला चालवण्याबद्‌दलची कार्यपध्दती तपशिलात दिली आहे.

७. न्यायालयात मुलाचे मूलपण लक्षात घेऊन मैत्रीपूर्ण वातावरण, मुलाचा जबाब नोंदवताना तज्ज्ञ व्यक्तीची जरूर तेव्हा मदत घेता येण्याची तरतूद आहे.

८. प्रत्येक गुन्ह्यासाठी कायद्यात किमान शिक्षा निश्चित केलेली आहे. जरुर तर न्यायाधीश ती वाढवू शकतात पण कमी करु शकत नाहीत हे वैशिष्ठ्य.

९. कायद्याचा अर्थ लावणे या व्यतिरिक्त न्यायाधिशांचा खटल्याच्या कामकाजावर विशेष ताबा असेल याची तरतूद.

**नकारात्मकः**

१. वारंवार चिंता व्यक्त केली गेली आहे ती १८ वर्षाच्या वयोमर्यादेची! वस्तुस्थिती अशी आहे की १४ वर्षावरील मुलांचेही आज लैंगिक संबंध असतात. वयात येणा-या मुलांमध्ये ही भावना नैसर्गिक आहे. १६ ते १८ वयोगटाचा वेगळा विचार व्हावयास हवा होता. तो न झाल्याने वयात येणा-यांच्या वागणुकीला गुन्हेगारीचे लेबल लागेल. प्रेमसंबंधाच्या विरोधातील कुटुंबीय, खाप पंचायत, जात पंचायत याचा फायदा उठवतील आणि तरूणांची आयुष्ये उद्‌वस्त होतील अशी कार्यकर्त्यांना भीती वाटते.

२. दोन अल्पवयीन मुलांमध्ये लैंगिक संबंध झाल्यास कायद्याने पीडित कोण आणि अत्याचारी कोण?

३. घटना माहीत झाल्यास तक्रार नोंदवणे अनिवार्य केले आहे. यासाठी अशा तक्रारी हाताळण्यासाठी सक्षम, पुरेशी व्यवस्था अस्तित्वात असणे गरजचे होते जी आज नाही. आजही सामाजिक वातावरण असे आहे की लोकांचा कल तक्रार न करता व्यक्तिगत प्रश्न म्हणून जमेल तसा हाताळण्याकडे आहे.या तरतुदीमुळे हे आणखी वाढेल अशी भीती आहे. पीडित मुलाला याचा फायदा मिळण्याऐवजी त्याची घुसमट वाढेल.

४. कोणत्या प्रकारचा अत्याचार असेल तर तक्रार अनिवार्य असेल हे स्पष्ट केलेले नाही.

५. 'प्रोटेक्शन' हा शब्द कायद्याच्या नावात आहे परंतु घटना घडल्यानंतर काय करावयाचे हे कायदा सांगतो. प्रतिबंधात्मक उपायांवर भर नाही (जसा तो कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ किंवा कुटुंबातील अत्याचार कायदा २००५ मध्ये आहे). शाळांमधून, संस्थांमधून लैंगिक शिक्षण किंवा 'जीवनकौशल्य शिक्षण' अनिवार्य करणे आवश्यक होते.

६. या कायद्यानुसार निरपराधित्व सिध्द करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे.हे योग्यच आहे असे काही कार्यकर्त्यांचे मत तर काहींना ते अयोग्य आहे आणि त्याचा गैरवापर होऊ शकतो असे वाटते.

७. जामिनाची तरतूद आहे किंवा नाही याचा उल्लेख कायद्यात नाही.

कायदा अस्तित्वात आला आहे.त्याचे नियमही तयार आहेत. त्यामुळे कायदा वापरून पहाणे, वापरताना येणा-या अडचणींची व्यवस्थित नोंद ठेवणे आपल्या हातात आहे. त्यातूनच आवश्यक त्या बदलांची मागणी आपण लावून धरू शकतो.

**********

## तक्रार नोंदवणे - प्रथम माहिती अहवाल (एफ्. आय्. आर.)

१. गुन्हा घडल्याची माहिती / तक्रार जवळच्या पोलीस स्टेशनवर त्यावेळी ड्यूटीवर असलेल्या अधिकाऱ्याकडे करणे.

२. ही तक्रार लिखित स्वरूपात असणे आवश्यक आहे. परंतु तक्रारदार अशिक्षित असेल तर त्याची तोंडी तक्रार पोलिसांनी लिहून घेणे व त्याला ती वाचून दाखवून त्याची त्यावर सही घेणे आवश्यक आहे.

३. पोलीस स्टेशनच्या डायरीमध्ये या तक्रारीचा गोषवारा पोलिसांना लिहावा लागतो.

४. तक्रारदाराला एफ्. आय्. आर. ची एक प्रत कोणतीही फी न आकारता देणे पोलिसांसाठी बंधनकारक आहे.

५. ज्या व्यक्तीच्या बाबतीत गुन्हा घडला ती व्यक्ती, तिच्या वतीने दुसरे कोणी किंवा गुन्ह्याची प्रत्यक्षदर्शी कोणतीही व्यक्ती एफ्. आय्. आर. दाखल करू शकते.

६. तक्ररीमध्ये गुन्ह्याचा पूर्ण तपशील असेलच असे नाही. तक्रारदाराला गुन्हेगाराचे नाव किंवा त्याने कोणत्या परिस्थितीत गुन्हा केला हे माहीत असेलच असे नाही. हे सर्व तपशील मिळवणे हे पोलिसांचे काम आहे तक्रारदाराचे नाही.

७. टेलिफोनवरून कोणी तक्रार केली तरी पोलिसांनी त्याबाबत तपास करणे गरजेचे आहे.

८. १५ वर्षाखालील मुलाचे / मुलीचे स्टेटमेंट त्याच्या / तिच्या घरी जाऊन पोलिसांनी नोंदवले पाहिजे, पोलीस स्टेशनवर बोलावून नाही.

९. मुलाचे स्टेटमेन्ट त्याच्या परिचित जागी, त्याला मोकळेपणा वाटेल अशा ठिकाणी नोंदवले जावे. मुलाच्या विश्वासातल्या व्यक्तीला यावेळी सोबत हजर असण्याचा हक्क आहे.

१०. भाषा प्रौढांची नको. मूल जे सांगेल ते तसेच्या तसे, त्याच्याच भाषेत नोंदवले गेले पाहिजे नाहीतर उलट तपासणीच्यावेळी अडचणी येऊ शकतात.

११. मुलाचा जबाब नोंदवण्यापूर्वी सर्व प्रथम ज्या जागेत, वातावरणात त्याच्यावर अत्याचार झाला तिथून त्याला हलवले पाहिजे.मग ते कुटुंब असो, संस्था असो की कामाची जागा असो.

१२. मुलाला प्रश्न विचारताना जरूर तेव्हा पोलिसांनी समुपदेशक किंवा मानसशास्त्र तज्ज्ञाची मदत घेतल्यास मूल मोकळेपणाने बोलेल आणि नेमकी माहिती पोलिसांना मिळू शकेल.

१३. सामाजिक कलंकाची भीती तर कधी अत्याचार करणारी व्यक्ती परिचयातली किंवा जवळची असल्यामुळे मुलावरील लैंगिक अत्याचाराबद्दल तक्रार नोंदवणे तक्रार करणा-याला अनेकदा कठीण जाते. यासाठी मुलाला आणि तक्रारदारालाही पोलिसांनी संवेदनाक्षम पद्धतीने वागवणे गरजेचे असते.

१४. पोलिसांनी कायद्यातील अत्यंत प्रभावी कलमे एफ्. आय्. आर. मध्ये लावावीत. गुन्ह्याच्या गांभीर्यावर पोलीस किती गंभीरपणे तपास करतात हे अवलंबून असते. उदा. संशयास्पद अवस्थेत घरकाम करणाऱ्या मुलाचा मृत्यू झाला असेल आणि ती आत्महत्या आहे असे दाखवण्याचा प्रयत्न असेल तर खुनाची कलमे लावावयास हवीत.

केसपेपरमध्ये सर्व महत्त्वाचा तपशील नोंदवलेला असावा. कारण अनेकदा केस सुनावणीला येईपर्यंत बराच वेळ जातो. अशा वेळी गुन्हा नोंदवला त्यावेळचा पोलीस अधिकारी तिथे असेलच असे नाही. हे अनेकदा पीडित मुलाच्या विरोधात जाऊ शकते.

**********

## बाल कल्याण समिती

बाल कल्याण समितीसमोर लैंगिक अत्याचार झालेले मूल आणले गेल्यास अंमलात आणण्याची प्रक्रियाः

- समस्या संवेदनशीलतेने हाताळणे.
- मुलाची मुलाखत खेळीमेळीच्या वातावरणात आणि कोणत्याही प्रकारचा दबाव न आणता घ्यावी.
- मुलाला स्वतः दोषी आहोत असे वाटणार नाही आणि आत्मविश्वासाने मूल मन मोकळे करेल असे पहाणे.
- बाल कल्याण समितीशी संबंधित स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक.
- अत्याचारित मूल मुलगी असेल तर स्वयंसेवी संस्थेची स्त्री सदस्य हजर असणे आवश्यक.
- मुलाचे लैंगिक शोषण कोण करीत आहे आणि त्याचे स्वरूप काय आहे हे निश्चित करणे.
- कुटुंबातील मुलाच्या विश्वासातली व्यक्ती (शोषणकर्ता नसेल तर) मुलासोबत असू शकते.
- मुलाच्या वयाची पडताळणी करून घेणे तसेच अत्याचार झालेल्या मुलाची / मुलीची वैद्यकीय तपासणी करून घेणे.
- पूर्वग्रह किंवा नैतिकतेच्या आधारावर निर्णय घेतला जाणार नाही याची काळजी घेणे.
- शोषणकर्ता कुटुंबातील असेल तर मुलाला त्वरित कुटुंबापासून दूर सुरक्षित जागी हलवणे.
- बाल कल्याण समितीने त्वरित शोषण कर्त्याच्या विरोधात फौजदारी कार्यवाही करणे.

- मूल संस्थेच्या काळजी आणि संरक्षणाखाली असेल तर गुन्हेगार व्यक्तीची माहिती समितीने ताबडतोब महिला व बाल विकास आयुक्तालयाला देणे.
- स्थानिक पोलीस ठाण्याला प्रथम माहिती अहवाल तयार करण्यास सांगणे तसेच गरजेनुसार तपासणी करण्याचा हुकूम देणे.
- जरूर तेव्हा स्वयंसेवी संस्था, कायदे तज्ज्ञ, मानसिक आरोग्य तज्ज्ञ आणि निवारण केंद्र (क्रायसिस इंटरव्हेन्शन सेंटर) यांची मदत घेणे
- जरूर तर मुलाला इतर योग्य संस्थेत किंवा खात्रीपूर्वक सुरक्षा देऊ शकेल अशा व्यक्तीकडे बाल कल्याण समिती सोपवू शकते.
- बाल कल्याण समितीच्या कक्षेत येणाऱ्या संस्थेमध्ये मुलांचे कोणत्याही प्रकारचे शोषण होणार नाही हे पहाणे आणि असे काही घडलेच तर त्या बाबतच्या कारवाईची यंत्रणा संस्थेत असेल याबाबत दक्षता घेणे.
- पुनर्वसनाचा आराखडा तयार करताना मुलाचा विचार घेतला गेला आहे याची खात्री करून घेणे.

**********

# संस्थेचे पदाधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी बाल संरक्षण धोरण
## (चाइल्ड प्रोटेक्शन पॉलिसी)

**उद्देशः**
मुलांच्या सुरक्षिततेसाठी संस्थेमध्ये आणि बाहेरही सुरक्षित आणि पोषक वातावरण निर्माण करणे हे आपले लक्ष्य आहे. असे वातावरण ज्यात मुले तर सुरक्षित राहातीलच पण त्यांना सन्मानाने वागवले जाईल एवढेच नाही तर स्वतःचे संरक्षण स्वतः करण्याइतपत संस्थेतील मुले सक्षम आणि कृतीशील होतील.
आमचा असा विश्वास आहे की प्रत्येक मूल मग त्याची जात, धर्म, वंश, वर्ण, देश किंवा लिंग कोणतेही असो लैंगिक शोषणापासून आणि इतर कोणत्याही शोषणापासून सुरक्षित असणे हा त्या मुलाचा मूलभूत हक्क आहे.

म्हणूनच आम्ही पुढील बाबींची जबाबदारी मनापासून स्वीकारत आहोत.

लैंगिक शोषणापासून मुलांना संरक्षण मिळावे या हेतूने बाल संरक्षणविषयक धोरणाची अंमलबजावणी करून मुलांचे कोणत्याही प्रकारचे शोषण करणा-या कुठल्याही व्यक्तीचे या संस्थेसोबत संबंध राहता कामा नयेत.जर संस्थेतील कुणाही व्यक्तीने मुलांचे लैंगिक किवा कोणत्याही प्रकारचे शोषण केले तर त्या व्यक्तीविरुध्द कडक दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल.मुलाचे हित केंद्रस्थानी मानून अशा कारवाईचे स्वरूप ठरवण्यात येईल.

लैंगिक दुर्वर्तन, अत्याचार किंवा शोषण करणारी व्यक्ती संस्थेच्या कर्मचा-यांपैकी, संस्थेशी संबंधित किंवा पदाधिकारी असेल तर अनेकदा संस्था-प्रमुख तक्रार करण्याचे टाळतात किंवा तक्रारीला उशीर करतात. यामागे संस्थेचे नाव खराब होईल अशी भीती अनेकदा असते. असे प्रकार होऊ नयेत म्हणून कितीही दक्षता घेतली तरी ते होणारच नाहीत अशी १०० टक्के खात्री कोणीच देऊ शकत नाही.परंतु वेळेवर तक्रार करणे, अत्याचारी कोणीही असला तरी त्याच्या विरोधात ठाम भूमिका घेणे हे मुलांचे हित पदाधिका-यांच्या मनाशी सर्वाधिक महत्त्वाचे आहे याचे आणि संस्थेच्या पारदर्शक स्वच्छ कारभाराचे निदर्शक असेल.

कुठल्याही प्रकारच्या अभिव्यक्तीद्वारे मुलांचा सहभाग असण्यावर आणि मुलांचे म्हणणे ऐकून घेण्यावर आमचा विश्वास आहे. म्हणूनच जिथे जिथे शक्य असेल तिथे तिथे मुलांना सामील करून घेतले जाईल.

**या धोरणाअंतर्गत पदाधिका-यांनी आणि कर्मचा-यांनी पाळावयाचे बाल संरक्षणात्मक नियम**

संस्थेत रहाणारी लहान मुले आईवडिलाच्या मायेला, स्पर्शाला पारखी झालेली असतात. हे प्रेम, माया त्याला मिळेल याची काळजी घेताना त्याचा गैरफायदा घेतला जाणार नाही याबद्दल जागृत असणे महत्त्वाचे आहे.

कोणीही व्यक्ती खालील गोष्टी करणार नाही याची संपूर्ण काळजी घेण्याची बांधिलकी आम्ही मानतो.

- कोणत्याही मुलाला मारहाण करणे त्याचा शारीरिक, मानसिक छळ करणे / त्याचे लैंगिक शोषण करणे.
- मुलगा अथवा मुलीसोबत शारीरिक / लैंगिक संबंध प्रस्थापित करणे.
- मुलगा अथवा मुलीसोबत कोणत्याही प्रकारचे शोषण करणारे संबंध प्रस्थापित करणे.
- मुलांना त्रासदायक, धोक्याचे ठरेल असे कुठल्याही प्रकारचे वर्तन करणे.
- अयोग्य किंवा लैंगिक उद्दिपन करणारी देहबोली किंवा तसे संकेत देणारे किंवा तसा आशय सुचवणारे सूचक वक्तव्य करणे.
- ज्या मुलांसोबत काळजी आणि संरक्षणाची प्रक्रिया चालू आहे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारच्या दबाव तंत्राचा वापर करणे.
- स्वतःचे काम मुलांकडून करून घेणे किंवा करायला भाग पाडणे.
- मुलांच्या बेकायदा आणि धोकादायक दुर्वर्तनामध्ये सहभागी होणे किंवा त्याकडे कानाडोळा किंवा दुर्लक्ष करणे.
- मुलांचा पाणउतारा होईल किंवा ती शरमेने संकोचून जातील किंवा त्यांना कमीपणा वाटेल अशा प्रकारचे वर्तन हेतुपुरस्सर करणे.
- काही निवडक मुलांना चांगली वागणूक देणे, त्यांना सवलती देणे आणि बाकीच्यांसोबत भेदभाव करणे.

## आपण सर्वांनी पुढील गोष्टींची पूर्तता करायला हवी

मुलांविषयी प्रेम, आपुलकी वाटते म्हणून आपण मुलांसोबत काम करतो.मुलांचे हक्क कोणते ते आपण पुस्तिकेच्या सुरुवातीला पाहिले. ते प्रत्यक्षात कसे उतरतील हे माहीत असणे गरजेचे आहे.

- कार्यालयीन वेळेत आपण फक्त आणि फक्त मुलांचा विचार करायला हवा.
- प्रत्येक मूल हे वेगळे असते आणि त्याची विचार करण्याची क्षमता वेगवेगळी असते. त्याच्या आवडी-निवडी भिन्न असू शकतात ही गोष्ट कर्मचा-याने लक्षात ठेवणे गरजेचे आहे.
- प्रत्येक मूल हे स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. त्याला / तिला अधिकार आणि जबाबदा-याही आहेत म्हणूनच मुलांचा सांभाळ करताना त्यांचा आदर करणे ही मोठयांची जबाबदारी आणि कर्तव्य आहे याची जाणीव सर्व कर्मचा-यांना असणे आवश्यक आहे.
- आपला जास्तीत जास्त वेळ मुलांसोबत घालवण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे मुलांमध्ये आणि आपल्यामध्ये आपुलकीचे नाते निर्माण होईल, त्यातून सर्वांचे काम सोपे होईल.
- मुलांशी खेळीमेळीने वागून त्यांच्या आणि आपल्या वयातील दरी कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा.
- ज्या मुलांसोबत आपण काम करतो त्यांना आपले नाव, आपले संस्थेतील पद आणि त्या पदाची जबाबदारी काय आहे याची माहिती देणे आवश्यक आहे.
- मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने संस्थेत काही ना काही कार्यक्रम आयोजित करत राहणे आवश्यक आहे. त्यावेळी मुलांचे म्हणणे लक्षात घ्यावे. त्यामुळे मुलांच्या मनात आपल्यासाठी आदर आणि विश्वास निर्माण होईल.
- मुलामुलींमध्ये निकोप सहकार्याचे आणि खेळीमेळीचे संबंध निर्माण होण्याच्या दृष्टीने त्यांना एकत्र येण्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे, संधी देणे. इतर संस्थांच्याबरोबरही असे कार्यक्रम आयोजित करणे शक्य आहे. एकत्र येण्याची संधीच न मिळाल्यामुळे निर्माण होणारे एकमेकाबद्दलचे अवाजवी कुतुहल,

आकर्षण आणि त्यातून घडणारी अविचारी कृती रोखण्यासाठी याचा उपयोग होऊ शकेल.

- छोट्या मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वयानुरूप मुलांचे गट पाडून त्यांची झोपण्याची व्यवस्था करणे.
- मुलांच्या लैंगिक आजाराबाबत सतर्क असणे आणि लक्षणांबद्दल योग्य ती समज असणे महत्त्वाचे. अनेकदा काही लक्षणे दुस-या कारणानेही असू शकतील.
- संस्थेपेक्षा मूल महत्वाचे. संस्था मुलांसाठी आहे याचे कायम भान असणे.
- संस्थेच्या भल्याचा विचार करताना आपण सर्वांनी मुलांचे मत जाणून घेणे आवश्यक आहे.
- सर्व मुलांना हक्क आहेत हे मुळात आपल्याला एक कर्मचारी म्हणून पटलेले आहे का? याचा विचार करणे आणि स्वतःला वेळोवेळी तपासणे गरजेचे आहे. त्यामुळे आपले विचार आणि मुलांबाबतची संवेदनशीलता वाढायला मदत होईल
- कर्मचा-यांनी सर्व मुलांना समान वागणूक, समान दर्जा आणि समान संधी देणे आवश्यक आहे.
- मुलामुलींना त्यांच्या समस्या मांडण्यासाठी मोकळे वातावरण निर्माण करून महिन्यातून एकदा (गरजेनुसार अधिक सुध्दा) बैठका त्यांच्या सोयीनुसार आयोजित कराव्यात.
- आपल्या संस्थेत मुलांच्या सूचना आणि तक्रारीसाठी एक सूचना / तक्रार पेटी असावी. त्यामध्ये कोणीही मूल आपल्या नावासकट किंवा नावाशिवाय तक्रार किंवा सूचनेची चिठ्ठी टाकू शकते. ही पेटी वरिष्ठ अधिका-यांनी मुलांसमोरच उघडून आलेल्या सूचना आणि तक्रारी याची नोंद घेत योग्य ती कारवाई करावी. एखाद्या तक्रारीबाबत विशेष चौकशी करण्याची गरज असल्यास मुलांना तशी माहिती द्यावी. मुलांना विश्वास वाटेल असे वातावरण तयार करावे.
- आपल्या संस्थेत किंवा आपल्या संस्थेच्या बाहेर आपल्या मुलांसोबत कोणत्याही प्रकारचा अत्याचार किंवा शोषण होत असेल तर संबंधितांनी ती बाब आपल्या वरिष्ठांच्या निदर्शनास आणून द्यावी. आवश्यक तेव्हा वरिष्ठांच्या सहकार्याने पोलिसात तक्रार करावी / तक्रार करण्यास सहकार्य करावे.

- कोणतेही मूल गुन्हेगार नसते याची जाणीव कर्मचा-याने ठेवणे आवश्यक आहे.
- संस्थेत राहाणे हा कोणत्याही मुलासाठी अंतिम पर्याय असला पाहिजे.
- कर्मचा-यांनी स्वतःची मुले आणि संस्थेतील मुले असा भेदभाव करू नये.
- संस्थेच्या कर्मचा-यांना मुलांच्या हिताच्या सूचना वरिष्ठांकडे करण्याचा अधिकार आहे.
- स्वयंसेवक किंवा पाहुण्यांना मुलांचे फोटो किंवा चित्रफीत संस्थेच्या योग्य त्या अधिकारी व्यक्तीकडून तशी परवानगी घेतल्याशिवाय काढता येणार नाहीत याची कल्पना द्यावी.फोटो कशा पध्दतीने काढता येतील यावर कडक निर्बंध असतील. ही सामुग्री दुस-या कोणत्याही कारणासाठी संस्थेबाहेर पूर्व परवानगीशिवाय वापरता येणार नाही. मुलांना ते फोटो दाखवले जावेत आणि शक्यतो त्यांच्या संमतीने हे केले जाईल असे पहावे.
- मुलांच्या छायाचित्रांचा वापर करताना त्यांची व्यक्तिगत ओळख पटणार नाही किंवा नेमके ठिकाण कळणार नाही याची संस्था काळजी घेईल.
- कोणत्याही कर्मचा-याने नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तीच्या कुटुंबातील बालविवाहास हजर राहू नये. या बाबत जर काही माहिती समजली तर ती संबंधितांच्या ताबडतोब लक्षात आणून द्यावी.
- या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी संस्थेच्या कर्मचा-यांचे प्रशिक्षण आणि त्यांची समज वाढविण्यासाठी वेळोवेळी बैठका, जागृतीचे कार्यक्रम घेणे आवश्यक आहे.
- प्रत्येक कर्मचा-याला नियुक्तीच्या वेळी सदर धोरणाची छापील प्रत वाचावयास सांगून त्यावर त्याची सही घेणे बंधनकारक आहे.
- संस्थेत येणा-या प्रत्येक व्यक्तीकडून सदर बाल संरक्षणविषयक धोरण वाचून घेऊन ते बंधनकारक आहे याची जाणीव देऊन त्यांची सही घेणे महत्त्वाचे आहे.

**********

## पुरवणी

टीपः खटल्यांचे खालील निकाल उपयोगात येऊ शकतात म्हणून येथे देत आहोत.

## पूर्व दाखले

सर्वोच्च न्यायालय व इतर उच्च न्यायालये यांनी न्यायपीठाच्या मध्यस्थीव्दारे लैंगिक गुन्ह्यांची प्रमाणके निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा काही प्रमाणकांची यादी खाली दिली आहे.

१. बालकांच्या बाबतीतील दुर्व्यवहार व लैंगिक शोषण यांना लागू असलेली व लैंगिक गुन्ह्यांशी संबधित अशी सर्वसाधारण तत्त्वे.

### (अ) लिंगप्रवेश

| पूर्व दाखले | आधार |
|---|---|
| १. लिंगप्रवेश अगदी थोड्या प्रमाणात असला तरी तो बलात्कार होय. | रणजित हजारिका विरुध्द असाम राज्य सरकार (१९९८ (८)) SCC ६३५. |
| २. पडदा फाटलेला असणे जरूरी नाही. | रणजित हजारिक विरुध्द आसाम राज्य सरकार (१९९८ (८)) SCC ६३५. |
| ३. बलात्कार सिध्द करण्यासाठी वीर्य बाहेर पडलेले असणे गरजेचे नाही. | महाराष्ट्र राज्य सरकार वि. चंद्रशेखर केवलचंद जैन (१९९० (१)) SCC ५५०. तसेच तामिलनाडू राज्य सरकार वि. सुरेश व इतर (१९९८ (२)) SCC ६७२. |

## (ब) अनुमती

| पूर्व दाखले | आधार |
|---|---|
| १. प्रत्यक्ष जबरदस्तीचा उपयोग झालेला असण्याची गरज नाही. जबरदस्तीची धमकीही पुरेशी आहे. | महाराष्ट्र राज्य वि. प्रकाश (१९९३ (१) SCC ६५३, तसेच महाराष्ट्र राज्य वि. प्रियशरण महाराज व इतर (१९९७ (४)) SCC ३९३. |
| २. जखमा नसणे ही बाब फिर्यादी पक्षाला घातक ठरत नाही. | राजस्थान सरकार वि. एन.के. (२००० (५)) SCC ३०. |
| ३. पीडित व्यक्तीला आरोपीने जबरीने नमवल्याचा व पीडित प्रतिकार करू न शकल्याचा पुरावा नसला तरी वैद्यकीय पुराव्यानेही आरोपीने केलेला बलात्काराचा गुन्हेगार सिध्द होतो. अशा परिस्थितीत अनुमती असल्याचे अनुमान करता येत नाही. | मुखेरा बेलाकोटा रेड्डी वि. आंध्रप्रदेश सरकार (१९९२ Cr. L.J.२२३६ A.P.) |

## (क) वय

| पूर्व दाखले | आधार |
|---|---|
| १. सामान्यतः अनुमतीचे वय १८ वर्षे आहे. भारतीय दंड संहिता १६ हे अनुमतीचे वय मानते. संशयास्पद परिस्थितीत वय ठरवण्याचा फायदा बळीला मिळावा. | कर्नाटक सरकार वि. पंजण्णा (२००० (६)) २ SCC १८८. |
| २. वय ठरवण्यासाठी जन्म दाखला हाच अंतिम पुरावा होय. पण भारतात बरेच वेळा जन्म दाखला उपलब्धच नसतो. न्यायालयाला संबंधित व्यक्तीच्या तपासणीतून निष्पन्न झालेल्या वयाच्या शारीरिक वैशिष्ट्यांवर व तोंडी पुराव्यावर आधारित आपला निष्कर्ष काढावा लागतो. | सिध्देश्वर गांगुली वि. पश्चिम बंगाल सरकार (AIR १९५८ SC १४३) |

## (ड) अनैसर्गिक गुन्हे (पुरुषाचा पुरुषावर बलात्कार)

| पूर्व दाखले | आधार |
|---|---|
| १. अनुमतीसह असो की अनुमतीशिवाय असो अनैसर्गिक गुन्हे हा खंड ३७७ नुसार अपराध ठरवण्यात आला आहे. परंतु बळी व्यक्तीवर जबरदस्ती केल्याचा आरोप नसेल तर शिक्षा कमी होईल. | फझल रब वि. बिहार सरकार (AIR १९८३ SC ३२३) |

## (२) कार्यपध्दती व पुराव्याची जमवाजमव

| पूर्व दाखले | आधार |
|---|---|
| १. प्रथम माहिती अहवाल दाखल करण्यातील विलंब कार्यपध्दतीला घातक ठरत नाही. (विशेषतः बालक दुर्व्यवहार व लैंगिक शोषण याबाबतीत) | हरपाल सिंह व इतर वि. हिमाचल प्रदेश सरकार (१९८१ (१) SCC ५६०) |
| २. गुन्हा घडल्याची नेमकी वेळ व तारीख उल्लेखिलेली नसेल तर कार्यपध्दतीला ते घातक ठरत नाही. | चित्तरंजन दास वि. पश्चिम बंगाल सरकार (१९६४ (३) SCR २३७) महाराष्ट्र सरकार वि. प्रियशरण महाराज व इतर |
| ३. विषयतज्ज्ञांकडून चौकशी, तक्रार, नोंदवण्यास नकार, तक्रारीची अन्यायकारक नोंद या सर्व पोलिसांच्या समस्या आहेत. त्यासाठी बळी व्यक्तीला त्रास होऊ देता कामा नये. | शेख झकीर वि. बिहार सरकार (१९८३ (४) SCC १०) बलवंत सिंह वि. पंजाब सरकार (१९८७ (२) SCC २७) महाराष्ट्र सरकार वि. चंद्रप्रकाश केवलचंद जैन (१९९० (१) SCC ५५०) |
| ४. बलात्काराच्या प्रकरणात बळी व्यक्तीच्या पुराव्याला दुजो-याची गरज असल्याबद्दल कायद्याचा किंवा व्यावहारिक शहाणपणाचा नियम नाही. | महाराष्ट्र राज्य वि. एम. एन. मर्डीकर (AIR १९९३ SC २०७) |

| | |
|---|---|
| ५. बलात्काराच्या प्रकरणात दुजोरा देणा-या पुराव्याची गरज नाही. बळी ठरलेली स्त्री ही गुन्ह्याची साथीदार नाही. तेव्हा तिच्या साक्षीची संशयी चाचणी घेणे योग्य नाही. | पंजाब सरकार वि. गुरूमित सिंह (AIR १९९६ SC १३९३) |

## (३) वैद्यकीय पुरावा

| पूर्व दाखले | आधार |
|---|---|
| १. बलात्काराच्या प्रकरणात वैद्यकीय पुराव्याची महत्त्वाची भूमिका आहे. बळी व्यक्तीचा पुरावा व वैद्यकीय पुरावा यामुळे बलात्कार सिध्द झाला की आरोपीच्या खोट्या निवेदनाचा बहाणा चालू दिला जाणार नाही. | वुन्नम लक्ष्मीनारायण वि. पोलिस निरीक्षक, नरसरावपेट (१९९२ Cr.L.J. ३३४ (A.P.) |

## (४) शिक्षा ठोठविणे

| पूर्व दाखले | आधार |
|---|---|
| १. अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणे तसेच तिला ठार मारणे यासाठी फाशीची शिक्षा आहे व त्यासाठी खालील दोन प्रयोजने आहेतः<br>▪ इतरांना अशा तऱ्हेचा गुन्हा करण्यापासून रोखणे.<br>▪ अशा तऱ्हेच्या गुन्ह्याबद्दल समाजात असलेल्या घृणेला वेगवेगळ्या प्रकारे अभिव्यक्ती देणे. | कामता तिवारी वि. मध्यप्रदेश सरकार (AIR १९९६ SC २८००) |
| २. बलात्कार करणारा किंवा बलात्काराचा प्रयत्न करणारा शिक्षेपासून वाचू शकत नाही. कारण तो समाजाविरुध्दचा एक क्रूर गुन्हा मानला जातो. | महाराष्ट्र सरकार वि. राजेंद्र जवनमल गांधी (१९९७ SCJ १७५) |